# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## व्यवस्थापन परिषद निवडणूक २०१८

### जाहीर सूचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादच्या अधिसभा सदस्यांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठाने मा. राज्यपाल महोदयांना व्यवस्थापन परिषद प्राधिकरणावर अधिसभेद्वारे सदस्य निवडून देण्याची निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी परवानगी देण्याबाबत दि. १४-०५-२०१८ रोजी पत्र पाठविले होते.

त्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी मा. राज्यपाल महोदयांनी दि. १५-०६-२०१८ रोजी अधिसभा बैठक घेण्यास परवानगी दिली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३० (४) (च), (छ), (ज), (झ) अन्वये निवडून आलेल्या सदस्यांच्या बाबतीत प्रारंभिक आरक्षण बिंदू चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करण्याचा अधिकार शासन अध्यादेश दि. २०-०१-२०१८ मधील तरतुदीनुसार कुलगुरूंना प्रदान करण्यात आला आहे.

सबब, कुलगुरूद्वारे प्रारंभिक आरक्षण बिंदू चिठ्ठया टाकून काढलेल्या सोडतीद्वारे निश्चित करण्यासाठी दि. २५-०५-२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली सोडतीचे आयोजन करण्यात आले आहे.

करिता, सर्व इच्छुक अधिसभा सदस्य सदर सोडतीसाठी उपस्थित राहू शकतात. या सोडतीस उपस्थित राहू इच्छिणाऱ्या सन्माननीय अधिसभा सदस्यास प्रवास भत्ता / दैनिक भत्ता देय असणार नाही, याची नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. निवडणूक/२०१८/
दिनांक :- २२-०५-२०१८

कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी